२९



असा. क्र. १०

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/२०००

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, जानेवारी ७, २०००/पौष १७, शके १९२१**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.–महाराष्ट्र राज्यातील मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या साधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक हद्दींमध्ये (आता बृहन्मुंबईमध्ये) लागू असलेला अपमृत्युनिर्णेता अधिनियम, १८७१, याचे निरसन करण्याकरिता अधिनियम. .. .. ३०–३२

दिनांक ६ जानेवारी २००० रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ७ जानेवारी २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम)

**महाराष्ट्र राज्यातील मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या साधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक हद्दींमध्ये (आता बृहन्मुंबईमध्ये) लागू असलेला अपमृत्युनिर्णेता अधिनियम, १८७१, याचे निरसन करण्याकरिता अधिनियम.**

१९९९ चा महा. अध्या. १७. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक २५ जुलै १९९९ रोजी अपमृत्युनिर्णेता (महाराष्ट्र निरसन) अध्यादेश, १९९९ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे) प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २२ ऑक्टोबर १९९९ रोजी राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्यानंतर, उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे पटलावर ठेवण्यात आला होता. तथापि, उक्त अधिवेशनाची सत्र समाप्ती दिनांक २३ ऑक्टोबर १९९९ रोजी झाल्यामुळे वेळेअभावी उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणारे विधेयक महाराष्ट्र विधानसभेत प्रस्तुत करता आले नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) द्वारे, तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्याच्या दिनांकापासून ज्या तारखेस सहा आठवड्यांचा कालावधी संपतो, त्या ३ डिसेंबर १९९९ या तारखेनंतर जारी असण्याचे बंद झाला असता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर होईल हे पाहणे इष्ट आहे असे वाटले ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि पूर्वोक्त प्रयोजनांसाठी उक्त अध्यादेश चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून उक्त अध्यादेश मागे घेऊन व त्याचे निरसन करून, त्यांनी दिनांक २ डिसेंबर १९९९ रोजी अपमृत्युनिर्णेता (महाराष्ट्र निरसन) (चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९ भूतलक्षी प्रभावाने, म्हणजेच दिनांक २६ जुलै १९९९ पासून प्रख्यापित केला ; १९९९ चा महा. अध्या. २९.

**आणि ज्याअर्थी,** अपमृत्युनिर्णेता (महाराष्ट्र निरसन) (चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९, याचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९९९ चा महा. अध्या. २९.

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, अपमृत्युनिर्णेता (महाराष्ट्र निरसन) अधिनियम, १९९९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २६ जुलै १९९९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १८७१ चा अधिनियम क्रमांक ४ याचे निरसन. **२.** अपमृत्युनिर्णेता अधिनियम, १८७१, हा महाराष्ट्र राज्यातील मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या साधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक हद्दीमधील (आता बृहन्मुंबईमध्ये) क्षेत्रात लागू असणारा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १८७१ चा ४.

निरसन व व्यावृत्तीचे परिणाम. **३.** याद्वारे, असे घोषित करण्यात येत आहे की, असे निरसन झाल्यावर पुढील परिणाम होतील :—

(१) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास,—

(अ) अपमृत्युनिर्णेता व अपर अपमृत्युनिर्णेता यांची पदे रद्द होतील आणि जर उक्त दिनांकाच्या लगतपूर्वी उक्त पदे धारण करणाऱ्या व्यक्तींची उक्त पदावरील नियुक्ती,—

(एक) महानगर दंडाधिकाऱ्याच्या संवर्गातून बदलीद्वारे करण्यात आलेली असेल तर, मुख्य महानगर दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाच्या आस्थापनेवर बदली करण्यात येईल ; आणि

(दोन) नामनिर्देशनाद्वारे करण्यात आलेली असेल तर, राज्य शासनांतर्गत राज्य शासनास योग्य वाटेल असा, मुंबईतील इतर समतुल्य पदांवर सामावून घेण्यात येईल ;

१८७१ चा ४. (ब) अपमृत्युनिर्णेता अधिनियम, १८७१ च्या अंमलबजावणीच्या प्रयोजनाकरिता नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची राज्य शासनास योग्य वाटेल अशा, मुंबईतील समतुल्य पदांवर बदली करण्यात येईल ;

(क) अपमृत्यूनिर्णेता न्यायालयासमोर प्रलंबित असलेली कोणतीही कार्यवाही किंवा चौकशी ही, १९७४ चा २. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १७६ च्या अर्थांतर्गत, कार्यवाही किंवा चौकशी असल्याचे मानण्यात येईल आणि राज्य शासनाने, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १७६ आणि १९७४ चा २. कलम १७४ च्या तरतुदींन्वये याबाबतीत काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे या बाबतीत अधिकार प्रदान केलेल्या दंडाधिकाऱ्याकडे ती हस्तांतरित करण्यात येईल आणि त्याच्याकडून त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

१९०४ चा बई १. (२) या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ च्या तरतुदी, निरसनाच्या संबंधात लागू होतील.

सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २९ याचे निरसन करणे व व्यावृत्ती.

१९९९ चा महा. अध्या. २९. ४. (१) अपमृत्युनिर्णेता (महाराष्ट्र निरसन) (चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे उक्त अध्यादेश निरसित करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही कृती (काढलेला कोणताही आदेश किंवा काढलेली अधिसूचना यासह) ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आल्याचे किंवा काढण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई